अमलीपदार्थ विक्री जाळ्याचा ‘चढता’ आलेख

गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थानमधून शहरात पुरवठा

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील तरुणाई नशेच्या विळख्यात सापडत असून, त्यांच्यापर्यंत अमलीपदार्थांचा पुरवठा करणारी एक साखळी कार्यरत असल्याची पुष्टी पोलिसांकडून मिळाली. शहरामध्ये अमली पदार्थांची विक्री होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केलेल्या कारवाईचा आलेख चढत्या क्रमाने आहे. २०२२ या वर्षामध्ये ५८ कारवाया करण्यात आल्या होत्या, तर चालू वर्षातील दहा महिन्यांतच आतापर्यंत २६० कारवाया करण्यात आल्या आहेत. शहरामध्ये गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थानमधून अमली पदार्थ आणून धुळ्यातील एक टोळी तरुणवर्गापर्यंत नशेची औषधे विक्री करत असल्याचीही माहिती पुढे आली आहे.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनीच एका कारवाईची माहिती देण्यासाठी बुधवारी आयोजित केलेल्या पत्रकार बैठकीत मागील चार वर्षांतील आकडेवारी आणि अटक केलेल्या आरोपींच्या संख्येची माहिती मांडली. २०२२ मध्ये ५८ कारवायांमधून १२५ आरोपींना अटक केली. २०२३ मध्ये ८६ कारवायांमधून १२५ आरोपींना, २०२४ मध्ये १४६ कारवायांमध्ये ३३६ आरोपींना तर २०२५ या चालू वर्षात २६० कारवायांमधून ४०० आरोपींविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (एनडीपीएस) गुन्हे दाखल करून अटक केल्याची माहिती पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस दलातील विविध ठाण्यांतर्गत अमली पदार्थ प्रतिबंधक पथकाकडून २०२५ या चालू वर्षातील ९ ऑक्टोबरपर्यंत २ कोटी ३७ लाख ५३ हजार ८४६ रुपये किमतीचा गांजा, चरससह नशेकरिता वापरले जाणाऱ्या गोळ्या व द्रव प्रकारातील (सिरप) औषधे जप्त करण्यात आली आहेत.

यासह आतापर्यंत केलेल्या कारवाईत ३ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. नुकत्याच केलेल्या कारवाईत अमली पदार्थांचा साठा पुरवणाऱ्या बाहेरील राज्यातील टोळी उघडकीस आणून त्यांच्याकडून नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या कोडीन सिरपच्या १८ हजार ३६० बाटल्या, एक मोटारकार, मोबाईल फोन, असा एकूण ७७ लाख ४४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

इंदोरमधील ग्लोबल एन्टरप्रायजेस, राधेय एन्टरप्रायजेस, गुजरातेतील धर्मेंद्र उर्फ गोपाल प्रजापती, इंदोर येथील दुर्गेश सीताराम रावत यांच्याकडून आरोपी ठोक दरात माल विकत घेत असल्याची माहिती पुढे आली व आरोपींकडे औषधे विक्रीचा व साठा करण्याचा कुठलाही परवाना आढळून आला नाही, असे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी पत्रकार बैठकीत सांगितले. यावेळी उपायुक्त रत्नाकर नवले, सहायक पोलीस आयुक्त संपत शिंदे, गुन्हे शाखेचे निरीक्षक संभाजी पवार आदी उपस्थित होते.

फरार आरोपीवर १५ गुन्हे दाखल

९ ऑक्टोबरच्या कारवाईतील आरोपी कल्पेश चंदूलाल अग्रवाल हा एका शाळेवर शिपाई असून, ज्ञानेश्वर यादव या फरार आरोपीवर १५ गुन्हे दाखल आहेत. तर सय्यद नबी सय्यद लाल हा वाळूजमधील जोगेश्वरी परिसरातील रहिवासी आहे. त्याच्यामार्फतच तरुणांमध्ये अमली पदार्थांचा पुरवठा करणारे जाळे विणले जात असल्याची माहिती होती. कल्पेश अग्रवाल, सय्यद नबी सय्यद लाल यांना अटक करण्यात आली आहे. तर दुर्गेश रावत, धर्मेंद्र उर्फ गोपाल खेमचंद प्रजापती यांनाही अटक करण्यात आली असून, या दोघांना २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहितीही पोलीस आयुक्त पवार यांनी दिली.

हिंगोलीचे माजी आमदार भाऊ गोरेगावकर अखेर शिंदे गटात

हिंगोली : विधानसभेचे तीन वेळा प्रतिनिधित्व करणारे काँग्रेसचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी अखेर मंगळवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदेसेनेत प्रवेश केला. या प्रवेशामुळे शिंदे शिवसेनेला बळ मिळेल.

हिंगोली विधानसभेचे तीन वेळा प्रतिनिधित्व केलेल्या माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर व आमदार प्रज्ञा सातव यांच्या अंतर्गत गटबाजीमुळे गोरेगावकर यांना उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे माजी आमदार गोरेगावकर यांनी विधानसभेची निवडणूक अपक्ष लढवली. त्यांचा पराभव झाला. मात्र, काँग्रेसने विधानसभेच्या निवडणुकीत बंडखोरी करणाऱ्या अनेक नेत्यांची पक्षातून हकालपट्टी केली. पण गोरेगावकर यांच्यावर कारवाई करण्यात आली नव्हती. त्यानंतर माजी आमदार गोरेगावकर कोणत्या पक्षात प्रवेश करणार, अशी चर्चा सुरू होती.

आधी शिंदे गटात आणि नंतर अजित पवार यांच्या पक्षात ते जातील, अशी चर्चा सुरू झाली. मंगळवारी त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिंदे सेनेत प्रवेश घेतल्याने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर शिंदे शिवसेनेला बळ प्राप्त झाल्याचे चित्र आहे.

माजी आमदार गोरेगावकर यांचा शिंदे सेनेत प्रवेश झाल्यामुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलणार आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे काही पदाधिकारी राष्ट्रवादी अजित पवार गटात जाण्याच्या तयारीत आहेत. उद्धव ठाकरे शिवसेनेचे काही पदाधिकारी भाजपाच्या वाटेवर आहेत. अजित पवार राष्ट्रवादीतील काही पदाधिकारी भाजपात जाण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे पक्षांतराची चर्चा जोरात सुरू आहे.

पुरानंतर वाळूची पुनर्मोजणी

विभागीय आयुक्तांची माहिती; विक्रीच्या परवानगीची मागणी

छत्रपती संभाजीनगर : मांजरा धरणातून मंगळवारी विसर्ग बंद करण्यात आला. पूर ओसरला आणि आलेली वाळू किती आहे, याचा अंदाज घेऊन वाळू सर्वेक्षकांनी पुन्हा मोजणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या असल्याची माहिती विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिली. दरम्यान २०० एकराहून अधिक भागात पसरलेली वाळू विक्री करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती शेतकऱ्यांनी लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे.

लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील गौर या गावात मांजरा नदीतून मोठ्या प्रमाणावर वाळू वाहून आल्याने २०० एकराहून अधिक शेतीमध्ये वाळूच वाळू पसरली आहे. शासनाने खरवडून गेलेली जमीन दुरुस्त करण्यासाठी काढलेल्या शासन निर्णयामुळे फारसे काही मिळणार नाही. सरकारने आमच्या शेतात आलेली वाळू विक्रीची परवानगी द्यावी, अशा मागणीचे निवेदन निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांना दिले. या अनुषंगाने तहसील पातळीवर निर्णय घेता येणार नाही. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करू असे ते म्हणाले. पुरामुळे नदीकाठी मोठ्या प्रमाणात वाहून आलेली वाळू पुन्हा मोजल्याशिवाय वाळूचे लिलाव करणे योग्य होणार नसल्याने सर्वेक्षण करणाऱ्यांना या बाबतच्या सूचना देण्यात आल्याचे विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले. दरम्यान बुजलेल्या विहिरी दुरुस्तीबाबतही बैठक घेतली बाधित शेतकऱ्यांनी अर्ज केल्यास एकूण मिळणाऱ्या ३० हजार रुपयांपैकी १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता दिला जाईल आणि त्यानंतर काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रक्कम दिली जाईल, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

‘लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील गौर या गावात पुरामुळे नदीने प्रवाह बदलला. त्यामुळे जमीन खरवडून गेली आहे. अनेक भागांत वाळू आली आहे. त्याचे मोजमाप करून माहिती द्यावी, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागास दिल्या आहेत.

– प्रसाद कुलकर्णी,
तहसीलदार, निलंगा

मुख्य सरकारी वकिलांवरील हल्ल्याचा निषेध

काळ्या फिती लावून आंदोलन

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा सरकारी वकील ॲड. अविनाश देशपांडे यांच्यावर एका वकिलाने केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्हा न्यायालयातील वकील, अभियोक्तांकडून बुधवारी लालफिती लावून कामकाज केले. ॲड. देशपांडे यांच्यावर त्यांच्या दालनात जाऊन भ्याड कृत्य करणाऱ्या वकिलाने सरन्यायाधीशांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ करण्यात येणाऱ्या आंदोलनात ॲड. देशपांडे यांनी काळ्या फिती लावून उतरण्यास नकार दिल्याचा खोटा संदेश पसरवला होता. त्याच्या निषेधार्थ बुधवारी वकिलांनी आंदोलन केले.

जिल्हा प्रभारी सरकारी वकील व अभियोक्ता ॲड. एस. व्ही. मुंडवाडकर यांनी काढलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवईंवरील हल्ल्याचा प्रयत्न केल्याच्या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी जिल्हा वकील संघाने ठराव पारित केला होता. त्यानुसार जिल्हा सरकारी वकील अविनाश देशपांडे यांच्यासह सर्व सरकारी, सहकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी लालफिती लावून कामकाज केले होते. १३ ऑक्टोबर रोजीही पुन्हा काळ्या फिती लावून लेखणीबंद आंदोलन केले होते व त्यामध्येही जिल्हा सरकारी वकील अविनाश देशपांडे हे सर्व सहकाऱ्यांसह सहभागी झाले होते. परंतु एका वकिलाने आकसवृत्तीने ॲड. देशपांडे यांच्या कक्षात जाऊन त्यांच्यावर त्यांनी सरन्यायाधीशांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ लावण्यात येणाऱ्या काळ्या फिती लावून घेण्यास नकार दिल्याचा चुकीचा आरोप करून त्यांच्यावर भ्याड हल्ला केला. हल्लेखोर वकिलाची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून, त्याच्यावर २०२२ मध्ये गुन्हाही दाखल झालेला आहे, असे नमूद करत जिल्हा सरकारी वकील तथा लोकअभियोक्तांनी बुधवारी लालफिती लावून कामकाज केल्याचे पत्रकात नमूद केले आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समितीची प्रारूप आरक्षण अधिसूचना

उद्यापर्यंत हरकती, सूचना सादर करण्याचे आवाहन

परभणी : जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रारूप आरक्षण अधिसूचना जाहीर करण्यात आली असून, उद्यापर्यंत (शुक्रवार) यासंदर्भात हरकती, सूचना सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या तरतुदी अन्वये जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकसाठी जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणातील एकूण सदस्य संख्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, तसेच स्त्रियांकरिता (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण स्त्रियांसह) राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग व निर्वाचक गणाबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रारूप आरक्षणाची अधिसूचनेची प्रत जिल्हाधिकारी परभणी यांच्या कार्यालयातील फलकावर तसेच जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर आणि तहसीलदार परभणी, सेलू, जिंतूर, पाथरी, मानवत, सोनपेठ, गंगाखेड, पालम, पूर्णा याचे कार्यालयातील फलकावर लावण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीच्या कार्यालयातील फलकांवरही ही अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

या आदेशाच्या मसुद्यास कोणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सकारण लेखी निवेदने, हरकती, सूचना जिल्हाधिकारी, परभणी व पंचायत समितीच्या बाबतीत संबंधित तहसीलदार यांच्याकडे उद्यापर्यंत सादर करावेत. या तारखेनंतर जिल्हाधिकारी किंवा संबंधित तहसीलदार यांच्याकडे आलेली निवेदने, हरकती, सूचना इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

प्रा. किरण सोनटक्के राज्य प्रमुखपदी

परभणी : येथील ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के यांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या शिक्षक सेलच्या राज्य प्रमुखपदी सोमवारी नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी याबाबत नियुक्तीपत्र जारी केले आहे. यावेळी पक्षाचे नेते जयंत पाटील, अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, खासदार नीलेश लंके, खासदार बजरंग सोनवणे आदींची उपस्थिती होती. या नियुक्तीनंतर शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबद्दल सातत्याने आपण आवाज उठवत राहू, अशी प्रतिक्रिया प्रा. सोनटक्के यांनी दिली.

उभ्या ट्रकवर धडकून दोन तरुण ठार

छत्रपती संभाजीनगर : रस्त्यावर उभ्या ट्रकवर धडकून दुचाकीस्वार दोन तरुणांचा मृत्यू झाला. ही घटना वैजापूर-गंगापूर रस्त्यावरील महालगाव शिवारात पंचगंगा साखर कारखान्याजवळ मंगळवारी मध्यरात्री घडली. सूरज व सुमीत, अशी मृत तरुणांची नावे आहेत. या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी सकाळी संतप्त नातेवाईक, नागरिकांनी रास्ता रोको केला. त्यामुळे बराच काळ वैजापूर-गंगापूर मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

मृत दोघेही सिमेंटचे गट्टू टाकण्याचे काम करत होते. काम आटोपून दोघेही दुचाकीवरून गंगापूरकडून वैजापूरच्या दिशेने जात होते. महालगाव शिवारात उभ्या ट्रकवर पाठीमागून दुचाकी धडकल्याने दोन तरुणांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक अशोक माने हे त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. विकी संकपाळ यांनी रुग्णवाहिकेतून दोघांना वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सकाळी त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

शाखा गारखेडा,
अजमेरा टॉवर, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर.

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

[सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ चे नियम ८(१)]

ज्या अर्थी खालील सही करणार **बँक ऑफ बडोदा चे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (SARFAESI) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ३ सह वाचले जाणारे कलम १३ (१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कर्जदार/जामीनदार यांना **दि. २१/०५/२०२५** रोजी मागणी नोटीस पाठवून त्यामधे नमुद रक्कम **रू.६६,७१,१७१.३३** (रू. सहासष्ट लाख, एकाहत्तर हजार, एकशे एकाहत्तर आणि पैसे तेहतीस केवळ) दि.२०/०५/२०२५ पासूनचे न आकारलेले व्याज आणि अवास्तवीक व्याज व इतर शुल्क वजा वसुली जर काही केली असेल तर त्यांना नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत भरणेस कळविले होते.

उपरोक्त नोटीसप्रमाणे मागणी केलेली संपूर्ण रक्कम मुदतीत भरण्यास भागीदार/ जामीनदार/ गहाणदार /कर्जदार **मेसर्स गायत्री एंटरप्रायझेस – प्रोप्रा. श्री. आशिष जगदीशप्रसाद शर्मा (मृत यांचे कायदेशीर वारस) १) श्रीमती शारदा आशिष शर्मा, २) श्री. अखिलेश आशिष शर्मा,** व जामीनदार **१) श्रीमती शारदा आशिष शर्मा २) श्री. संजय जयसिंगराव भोसले** यांनी कसूर केलेली आहे. त्या अर्थी, कर्जदारास /जामीनदार व तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ८ सह वाचले जाणारे उपरोक्त कायद्याचे कलम १३ मधील उपकलम (४) अन्वये बहाल अधिकारान्वये खालील मिळकतीचा **दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

संरक्षीत मालमत्तेच्या मुक्ततेसाठी असलेल्या उपरोक्त कायद्यामधील कलम १३ चे उपकलम (८) मधील तरतुदीमधे उपलब्ध असलेल्या वेळेसाठी कर्जदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

सबब विशेषतः कर्जदार/जामीनदार व तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही, कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपर कोणीही व्यवहार केल्यास तो व्यवहार **बँक ऑफ बडोदा, गारखेडा शाखा,छत्रपती संभाजीनगर** यांचा रू.६६,७१,१७१.३३ (रू. सहासष्ट लाख एकाहत्तर हजार एकशे एकाहत्तर आणि पैसे तेहतीस केवळ) दि. २०/०५/२०२५ पासूनचे न आकारलेले व्याज आणि अवास्तवीक व्याज व इतर शुल्क वजा वसुली जर काही केली असेल तर

अचल मालमत्तेचे विवरण

१) नायगाव ता. छत्रपती संभाजीनगर जिल्हा छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गट क्रमांक १२४ येथील २ हेक्टरपर्यंतच्या जमिनीचे साधे गहाण ज्याची चतु:सीमा.

पूर्व : सावंगी गावाची सीमा
पश्चिम : फकिरा वजीर पटेल यांची जमीन
दक्षिण : श्री. शेख अब्दुल मूसा यांची जमीन
उत्तर : गहाणखत खरेदी केलेली जमीन विक्री करार क्रमांक १३५३/०७ दिनांक २९/०३/२००७

२) पीर पिंपळगाव, ता. जालना जिल्हा जालना येथे स्थित असलेल्या गट क्रमांक ५० ते २.४२ हेक्टरच्या एनए जमिनीचे साधे गहाण ज्याची चतु:सीमा.

पूर्व : गहाणखत खरेदी केलेली जमीन विक्री करार क्रमांक ११७५/०७
पश्चिम : सरकारी कुरण जमीन
दक्षिण : श्री. गौरीशंकर डी. शर्मा यांची जमीन
उत्तर : गहाणखत खरेदी केलेली जमीन विक्री करार क्रमांक ११७५/०७

दिनांक : १५/१०/२०२५
ठिकाण : नायगाव, छ. संभाजीनगर/ पीर पिंपळगाव,जालना

सही/–
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

(टिप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

महाराष्ट्र विधी विद्यापीठाचा शनिवारी दीक्षांत समारंभ

छत्रपती संभाजीनगर : येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा चौथा दीक्षांत सोहळा शनिवारी सकाळी ११ वाजता होणार असून, हा समारंभ सर्वोच्च न्यायालयाचे न्या. विक्रम नाथ, विद्यापीठाचे कुलपती न्या. प्रसन्ना वराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. या समारंभासाठी बीए एलएलबीच्या ४२, एलएलएमच्या ५७ तर एलएलडीच्या एका विद्यार्थ्याने नोंदणी केली असून, या शंभर विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभात पदवीचे वितरण करण्यात येणार आहे. याशिवाय गुणवंत विद्यार्थ्यांना नऊ सुवर्णपदकांसह एक रोख पारितोषिकही देऊन गौरवण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. बिंदू रोनाल्ड यांनी आयोजित पत्रकार बैठकीत दिली.

शैक्षणिक वर्ष २०२० ते २०२५ दरम्यान बीए एलएलबी ऑनर्स, एलएलएम, एलएलडी विद्यार्थ्यांचा हा दीक्षांत सोहळा आहे.

यंदा दहा नवीन पदके

यंदापासून दीक्षांत समारंभात दहा नवीन सुवर्णपदके व पारितोषिकांचा समावेश करण्यात आला आहे. ही नवीन पदके व पारितोषिक न्यायाधीश, वरिष्ठ वकील, उद्योजक तसेच इतर मान्यवरांनी प्रायोजित केली आहेत. ज्यात ॲड. एम.आर. बोर्डे सुवर्णपदक, प्रा. डॉ. सी.जे. सॅम्युअल सुवर्णपदक, राज नारायण बागला सुवर्णपदक, ललितमोहन हिरालाल वकील सुवर्णपदक, न्या. नरेंद्र चपळगावकर सुवर्णपदक, ॲड. बी. एन. बाजपाई, स्व. एन.एम. धोर्डे, न्या. एस.सी. माल्टे, ॲड. सी.के. दफ्तरी आदी पारितोषिक आणि सुवर्णपदकांचा समावेश आहे, अशी माहिती प्रा. आनंद जयशेट्टे यांनी यावेळी दिली.

मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
मराठवाडा अर्बन बँक्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि., छत्रपती संभाजीनगर
"अर्बन बँक भवन", प्लॉट नं. २७, विकासपुरी, चिनार गार्डन जवळ, पडेगांव, छत्रपती संभाजीनगर - ४३१००२

जाहीर नोटिस

अर्जदार बँक:- **लातूर अर्बन को-ऑप बँक लि, लातूर शाखा- औसा रोड, लातूर**

जा.क्र.जा./नो/१०१/९७/२५-२६

विरुद्ध - जाब देणार

दावा क्र.	कर्जदाराचे नाव	जामिनदारांचे नाव व पत्ता	दावा रक्कम रुपये
५१९ २०२५-२०२६	**श्री ओमनंदी मोबाईल** **प्रोप्रा. श्री. अक्षय दिलीप पिंपरे** नंदी स्टॉप, औसा रोड, लातूर.	**१. श्री. अजय ओमप्रकाश लड्डा,** मु.पो. तळेगाव घाट ता.अंबाजोगाई जि. बीड. **२ श्री. अक्षय सुधाकर गुरव,** मु. पो. बोरफळ वर्वाडा, ता. औसा जि. लातूर **३ श्री. शैलेश संदीपान मांडे,** मोती नगर, कोरे गार्डनजवळ, लातूर	**१३,०६,१५७.१०/-**

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिवादींना अर्जातील रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादीना समन्स रुजु न झाल्याने व त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक ०६/११/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रासह आपण यान्यायालयात हजर रहावे.

या नोटिसद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते कि, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल म्हणुन आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

सुनावणीचे ठिकाण:
मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
मराठवाडा अर्बन बँक्स् को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि. छत्रपती संभाजीनगर
अर्बन बँक भवन प्लॉट क्र. २७. विकासपुरी चिनार गार्डनजवळ पडेगाव,
छत्रपती संभाजीनगर - 431002

कोर्टाचा शिक्का

सही/-
मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
मराठवाडा अर्बन बँक्स् को-ऑपरेटिव्ह
असोसिएशन लि. छत्रपती संभाजीनगर

पाण्यावरील पणतीला पसंती

दिवाळीच्या खरेदीला उधाण

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : संत-महंतांनी तेलाअभावी पाण्याच्याच आधारे पणत्या पेटवून दीपावलीच्या सणोत्सवात प्रकाशाने आसमंत उजळून टाकल्याच्या आख्यायिका आपण ऐकत आलेलो आहोत. परंतु, आजच्या मानवनिर्मित तंत्रस्नेही युगात चक्क पाणी टाकताच पणत्या पेटत असल्याचे प्रत्यक्ष उदाहरणच समोर असून, या पाणी टाकताच चेतणाऱ्या पणत्या पाहून त्यांच्या खरेदीला पसंती मिळत असल्याचे चित्र बाजारपेठेत दिसून येत आहे.

पाण्याने पेटणाऱ्या पणत्यांमध्ये संवेदकांचा (सेन्सर) वापर करण्यात आलेला आहे. या संवेदकाच्या आधारानेच पणती पाणी टाकताच चेतते. पणतीचे हे चेतणे हा विजेच्या दिव्याप्रमाणे आहे, पण भास मात्र दीपकसारखा आहे. एका पणतीची किंमत २५ ते ३० रुपये असून, डझनाच्या प्रमाणात विक्रीची पद्धत सुरू आहे. त्यातही लहान-मध्यम-मोठ्या आकाराच्या पणत्या आहेत.

बाजारात पणत्यांचेच दोन डझन केवळ प्रकार आहेत. अकरा आणि एकवीस संख्येतील पणत्यांना एकाच तबक स्वरुपात तयार करण्यात आलेले प्रकारही बाजारात पाहायला मिळत आहेत. आकर्षक, रंग-रंगोटी केलेल्या या पणत्यांचे तबक दीडशे ते दोनशे रुपयांपर्यंत आहे. डिजिटल पणत्याही असून, गोल आकारातील सेलवरील या पणत्या एका बटणावरून सुरू होणाऱ्या आहेत.

खापराच्या पणत्यांनाही आकर्षक कलाकुसरीच्या आधारे तयार करण्यात आलेले आहे. खापराची पणती म्हणजे खाली पडताच फुटणार, हा समजही गैर ठरणारा असून, खापराच्याच पण मजबूत पणत्या पाहायला मिळतात. मेणबत्त्यांना ठेवण्याचे सोनेरी स्टॅण्डही बाजारात उपलब्ध असून, प्रकाशाच्या या सणासाठी नाना प्रकार उपलब्ध असल्याने ग्राहकांना नावीन्यतेची खरेदी करता येत असल्याचे येथील व्यावसायिक बाबूमियाँ बलूनवाले यांनी सांगितले.

आकाश कंदिलांमध्ये पुन्हा एकदा चीनमधील उत्पादित मालाचीच खरेदी होत आहे. चीनी बनावटीचे आकाश कंदील बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून, त्यांची गोलाकार ओळख कायम लक्षात येण्यासारखी आहे. दुकानदारांकडूनही काही चिनी उत्पादित मालाची ओळख पूर्वीसारखी लपवून ठेवली जात नाही. यंदा झोतपुरी कुर्ता-पायजमा प्रकारातील कपड्यांचा वापर केलेले झोत आकाश कंदिलांमध्येही बाजारात दाखल झालेले आहेत. सोनेरी रंगाच्या पट्ट्यांना झोत कपड्यांनी जोडून त्यावर आकर्षक नक्षीकाम केलेले हे आकाश कंदील असून, ३०० रुपयांपासून ५ हजारांपर्यंत त्याची किमत असल्याचे पाहायला मिळते.

प्लास्टिक फुलांच्या माळांची रस्त्यापासून ते मोठमोठ्या मॉलमधूनही विक्री होताना दिसते आहे. पिवळे, शेंदरी, पांढऱ्या रंगातील प्लास्टिकच्या झेंडूंच्या माळा शहरातील प्रमुख मार्गावर पावलो-पावली दिसत असून, रांगोळीच्या मध्यभागी कमळासह अन्य फुलांचा गुच्छा दिसेल, असाही एक उत्पादित माल बाजारपेठेत दिसून येत आहे. त्याला महिला वर्गाकडून विशेष मागणी होत असून, घर-अंगणासमोरील रांगोळीची हा प्लास्टिक फुलांचा गुच्छा अधिक शोभा वाढवणारा दिसतो आहे.

दिवाळसणाला आठवडाही उरलेला नसून, मागील चार दिवसांपासून खरेदीला जाणाऱ्या ग्राहकांमुळे शहरातील रस्ते गर्दीने फुलून जात आहेत. जालना मार्गासह त्याला समांतर रस्त्यांवरही गर्दीमुळे वाहतूक कोंडी होत आहे. सकाळपासून ते रात्रीपर्यंत वाहतुकीची कोंडी निर्माण होत असल्याचे चित्र शहरामध्ये सध्या दिसून येत आहे.

CENTRUM Home Loans
Aao milkar ghar banaye

कॉर्पोरेट आणि नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. ८०१, सेंट्रम हाऊस, सीएसटी रोड, विद्यानगरी मार्ग,
कलिना सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०००९८, सीआयएन क्र. यू६५९२२एमएच२०१६पीएलसी२७३८२६

मागणी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३(१) सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत.

निम्नस्वाक्षरीकार हे सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी आहेत, त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (निर्देशित कायदा) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सहवाचता निर्देशित वरील कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिकृत अधिकाऱ्याने सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केल्या आहेत, ज्यामध्ये खालील कर्जदारांना (निर्देशित कर्जदाराला) त्यांना जारी केलेल्या संबंधित मागणी सूचनांमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन केले आहे, जे खाली दिले आहेत.

वरील संदर्भात, पुन्हा एकदा, कर्जदाराला सूचना देण्यात येत आहे की, सदर ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत खाली दर्शविलेल्या रकमा, थकबाकी पूर्ण परतफेडीच्या तारखेपर्यंतचे पुढील व्याज आणि इतर शुल्कांसह, वरील मागणी सूचनांमध्ये तपशीलवार सांगितल्याप्रमाणे, वरील कर्जदारांनी अमलात आणलेल्या इतर कागदपत्रांसह/लेखन सहवाचता खाली नमूद केलेल्या तारखांपासून कर्ज करारांतर्गत देय असलेल्या देयकाच्या आणि/किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना पैसे द्यावेत. कर्जाच्या देय परतफेडीसाठी सुरक्षा म्हणून, खालील मालमत्ता अनुक्रमे सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना कर्जदारांनी गहाण ठेवल्या आहेत.

अ.क्र.	कर्ज खाते क्र./ कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार यांचे नाव	एकूण थकबाकी (रु.)	एनपीए तारीख कलम १३(२) सूचना तारीख एफसीएल तारीख	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)
१	**पीएनक्यूएबी२४०१६२२४ आणि पीएनक्यूएबी२४०१६२४४/ तारा फकिरा गावंडे/ शरद फकिरबा गावंडे/ फकिरा गावंडे/ रवींद्र हरिभाऊ हिवाळे (जी.)**	**रु. ९,५०,२१५/- (रुपये नऊ लाख पन्नास हजार दोनशे पंधरा फक्त)**	०३.०९.२०२५ ०१.१०.२०२५ २७.०९.२०२५	धारण प्लॉट क्र. ९९/ पूर्व भाग (मिळकत क्र. ९५९८), मोजमापे ४३.९३ चौरस मीटर, गट क्र. ०९, मौजे-वडगाव कोल्हाटी, ता. आणि जिल्हा औरंगाबाद-४३११३६, महाराष्ट्र यांच्या हक्कांमध्ये, स्थावर मालमत्तेचे तुकडे आणि पार्सल, द्वारे सीमाबद्धः- पूर्वः प्लॉट क्र. १००, पश्चिमः प्लॉट क्र. ९९ चा उर्वरित भाग, उत्तरः त्याच गटाची उर्वरित जमीन, दक्षिणः २० फूट रस्ता.

जर कर्जदारांनी वर सांगितल्याप्रमाणे **सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांना पैसे देण्यास अपयशी ठरले, तर **सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** निर्देशित कायद्याच्या कलम १३(४) आणि लागू नियमांनुसार वरील सुरक्षित मालमत्तेविरुद्ध कारवाई करेल, खर्च आणि परिणामांच्या बाबतीत कर्जदारांच्या जोखमीवर असेल.

सदर कर्जदारांना सदर मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे **सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्या पूर्व लेखी संमतीशिवाय हस्तांतरित करण्यास कायद्यानुसार मनाई आहे, कोणत्याही व्यक्तीने सदर कायद्याच्या तरतुदी किंवा त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांचे उल्लंघन केले किंवा उल्लंघन करण्यास प्रोत्साहन दिले, तर त्याला कायद्यानुसार तुरुंगवास आणि/किंवा दंडाची शिक्षा होईल.

ठिकाण : महाराष्ट्र / दिनांक : १६.१०.२०२५

सही/-, अधिकृत अधिकारी, सेंट्रम हाऊसिंग फायनान्स लि. यांच्यासाठी

pnb Housing Finance Limited
Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए - ई-लिलाव - स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतूदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्श भवन, २२ कस्तुर्बा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com

औरंगाबाद शाखा कार्यालय: ई-१, ई-२ व ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद- ४३१००१, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. ''डी'' मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. ''सी''मध्ये वर्णिल्यानुसार) **''मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''**/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **''मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/ARNG/0122/948410, ब्रिजेंद्र द्वीवेदी/ जयश्री तुकाराम काळे- शाखा कार्यालय: औरंगाबाद	**रु. २२३५५१७.९६ व १७.०६.२०२४ रोजीप्रमाणे**	प्रत्यक्ष ताबा	रो हाऊस नं. जी ८, गट नं. १२९, फेज २, अक्षद सुपर सिटी, गंगापूर जहांगीर, औरंगाबाद, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र, भारत.	**रु. १३०५०००**	**रु. १३०५००**	**३०.१०.२५**	**रु. १०,०००**	२५.१०.२०२५ रोजी दु. १२.०० व दु. ०४.०० दरम्यान	३१.१०.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान	ज्ञात नाही

* **त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ. सह एकत्रित. ** ''पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. ''के'' मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरीददार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्याकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.** (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून ''पीएनबीएचएफएल''ला/ ''पीएनबीएचएफएल''च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि/ किंवा वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची वासलात आणि दर्जा रकाना क्र. ''के'' मध्ये नमूद करण्यात आले आहे. (२.) भावी खरीददार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. ''के'' मध्ये नमूद केलेली व मंजूर केलेली प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता ''पीएनबीएचएफएल''कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादेत नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार/ खरीददाराने त्याचदिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता/ सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. **(४.) सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट- www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहाणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास ''ई-१, ई-२ व ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र'' पाटील- टोल-फ्रि नं.: १८०० १२० ८८००, ई-मेल: auction@pnbhousing.com, जी ''पीएनबीएचएफएल''ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

स्थळ: औरंगाबाद दिनांक: १६.१०.२०२५

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड